**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**

**शासन निर्णय क्र. मलवि २०१८/प्र.क्र.१५/उद्योग-६**

मंत्रालय, मुंबई:-४०००३२

दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८

**वाचा:- उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र आयआयआय-पॉलिसी-२०१०/प्र.क्र.७६८/उ-२, दि.२२/०२/२०१३.**

**प्रस्तावना-:**

नारळाच्या झाडाच्या प्रत्येक भागाचा वापर मनुष्यास उपयुक्त वस्तू तयार करण्यासाठी होतो. म्हणून या झाडाला "कल्पवृक्ष" असे संबोधले जाते. नारळापासून स्वयंपाकासाठी तेल, कोवळा गर व पाणी पोषक पेय म्हणून,तसेच नारळाच्या सोडणापासून काथ्या व कोको पीथ इ. अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे देशामध्ये सागरी किनारा लाभलेल्या महाराष्ट्रासह सर्व राज्यांतील अनेक ग्रामीण नागरिकांचा उदरनिर्वाह नारळाच्या विविध उत्पादनापासून होत आहे.

काथ्या उद्योग हा प्रामुख्याने एक पारंपारिक, शेतीआधारित रोजगारभिमुख कुटिरोद्योग असून, या क्षेत्रामधून मोठया प्रमाणावर निर्यात देखील करण्यात येत आहे. काथ्या उत्पादन करणा-या राज्यांमध्ये नारळाच्या सोडणापासून काथ्या तयार करणे व काथ्यापासून दोरी व इतर तत्सम उत्पादनांचे हजारो कुटीरउद्योग आहेत. यामध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या क्षेत्रातील महिलांचे प्रमाण अधिक आहे. काथ्यापासून तयार करण्यात येणारी विविध प्रकारची उत्पादने संपूर्णतः पर्यावरण पूरक व संपूर्णत: विघटनशिल आहेत.

सद्यस्थितीत उपलब्ध नारळाच्या सोडणापैकी फक्त १ टक्के सोडणाचा वापर हा काथ्यावर आधारित उत्पादने तयार करण्यासाठी करण्यात येत असल्यामुळे महाराष्ट्रात काथ्या उद्योगाच्या विकासासाठी मोठी क्षमता आहे. सबब काथ्या उद्योग विकासाच्या दृष्टीने सक्षम धोरण व काथ्या उद्योजकांकरिता विशेष धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यामध्ये काथ्या उद्योगाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन देणे जेणे करुन ग्रामीण उद्योजकता वाढविणे, काथ्या व कोको पीथ यांच्यापासून काथ्याची मुल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून महिला उद्योजकता विकास व त्यायोगे महिलांचे सबलीकरण करणे, भारत आणि भारताबाहेर पर्यावरण शाश्वत व पर्यावरणपूरक अश्या काथ्याच्या उत्पादनांच्या वापरास प्रोत्साहित करणे, स्थानिक व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत काथ्या व काथ्याची उत्पादनांसाठी बाजारपेठ विकसित करणे, राज्यातील नारळाच्या सोडणाचा

जास्तीत जास्त वापर करुन नारळाच्या लागवडीस प्रोत्साहन देणे या दृष्टीकोनातून राज्यातील काथ्या उद्योग विकासाकरिता राज्य काथ्या उद्योग विकास धोरण२०१८- ला शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर धोरणाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-

१)**धोरणाची व्याप्ती**

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादनासाठी उद्योग आधार ज्ञापन (UAM) धारण करणारे व अस्तित्वात असलेल्या सामुहिक प्रोत्साहन योजना मधील पात्र उपक्रम प्रस्तुत धोरणातील विशेष प्रोत्साहन योजनेसाठी पात्र असतील.

**२) विशेष प्रोत्साहन योजनेचे स्वरुप**

**अ) सामुहिक प्रोत्साहन योजना अंतर्गत अतिरिक्त सवलती**

काथ्या उद्योगासाठी अ व ब विभागातील उद्योगासाठी क विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील. क व ड विभागातील उद्योगासाठी ड+ विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील. तसेच ड+ व विना उद्योग जिल्हा विभागातील उद्योगांसाठी नक्षल प्रभावित विभागातील सवलती अनुज्ञेय राहतील.

**ब) विशेष भांडवली अनुदान**

नवीन किंवा विस्तारीत पात्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना तालुका वर्गीकरणानुसार स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या **३०** ते **३५** टक्के दराने रु **५०** लाख मर्यादेपर्यंत भांडवली अनुदान अनुज्ञेय राहील. प्रस्तुत भांडवली अनुदान उद्योग घटकाचे उत्पादन सुरु झाल्यापासून **५**समान वार्षिक हप्त्यांमध्ये वितरीत करण्यात येईल.

| अ. क्र. | सा. प्रो. योजना २०१३ अंतर्गत तालुक्यांचे वर्गीकरण | भांडवली अनुदान (स्थिर भांडवल गुंतवणूकीच्या %) | विशेष भांडवली अनुदान कमाल मर्यादा (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | अ आणि ब | ३० | २० |
| २ | क | ३५ | ३० |
| ३ | ड | ३५ | ४० |
| ४ | ड+ | ३५ | ५० |
| ५ | उद्योग नसलेले जिल्हे व नक्षल प्रभावीत विभाग | ३५ | ५० |

केंद्रशासन, राज्यशासन तसेच त्यांचे उपक्रम यांचेमार्फत इतर योजनेअंतर्गत भांडवली अनुदानास पात्र उद्योग घटकांना संबधित योजनेचा लाभ अनुज्ञेय होईल परंतु एकत्रित भांडवली अनुदानाची रक्कम जास्तीत जास्त ५० टक्के पेक्षा जास्त अनुज्ञेय होणार नाही.

**३) औद्योगिक समुह विकास केंद्र**

काथ्यावर आधारित सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाच्या/उद्योगाच्या विकासासाठी समुह विकास योजनेचा अवलंब केला जाईल. योजनेतंर्गत काथ्यावर आधारीत सामूहिक सुविधा केंद्र उभारणी करण्याकरीता ९०% अनुदान देय राहील.

**४) काथ्या उद्योग उबवन (Incubation), संशोधन आणि विकास केंद्र**

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या महाकॉयर, कुडाळ येथे काथ्या उद्योग उबवन, संशोधन आणि विकास केंद्र उभारण्यास मान्यता देण्यात येत आहे .

प्रस्तूत काथ्या उद्योगासाठी विशेष प्रोत्साहन योजनांच्या विविध सवलती, इतर अंमलबजावणी इ.बाबत आवश्यक मार्गदर्शक तत्वे याबाबत सविस्तर कार्यपध्दतीबाबतचा आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

**५) राज्यस्तरीय अंमलबजावणी समिती**

राज्य काथ्या धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी व समस्यांचे निराकरण व धोरणाचे सनियंत्रण करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे-:

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विकास आयुक्त (उद्योग) | - | अध्यक्ष |
| २. | व्यवस्थापकीय संचालक (महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ) | - | सदस्य सचिव |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ) | - | सदस्य |
| ४. | सह आयुक्त (जी.एस.टी. विभाग) | - | सदस्य |
| ५. | उद्योग सह संचालक (सु.ल.म.उ.) | - | सदस्य |

राज्यस्तरीय अंमलबजावणी समितीमार्फत धोरणाअंतर्गत विविध सवलतींच्या पात्रता निकष व वितरणाच्या कार्यपध्दती व त्यात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात येतील.

**६) अंमलबजावणी यंत्रणा:-**

सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत देण्यात येणारी विविध अनुदाने व प्रोत्साहने तसेच समूह विकास योजनेअतर्गत देय अनुदान याबाबतची अंमलबजावणी उद्योग संचालनालय यांनी करावी. तसेच विपणन सहाय्य, तांत्रिक कौशल्य व उद्योजकता विकास, उबवन (Incubation) व संशोधन विकास केंद्र योजनांची अंमलबजावणी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांनी करावी.

**७) धोरणाची वैधता:-**

सदर राज्य काथ्या उद्योग धोरण शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीसाठी अथवा पुढील आदेशापर्यंत वैध राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या व नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०२१५१२२४१८८८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2018.02.15 12:39:50 +05'30'

**(राजीव मा.आंबीकर)**

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन,मुंबई
४. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
५. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई
८. विकास आयुक्त तथा उद्योग संचालक, नवीन प्रशासन इमारत, पहिला मजला, मंत्रालय,मुंबई-३२.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

**Government of Maharashtra**
**Industries, Energy and Labour Department**
**Government Resolution No. MLV 2018/ C.R.15/Industries-6**
Mantralaya, Mumbai-400032
Date – 15.02.2018

**READ** **:-** Industries, Energy and Labour Department, Government Resolution No. III-Policy 2010/ C.R.768/Industries-2, dated 22/2/2013

**PREAMBLE :-**

Coconut tree is known as Kalpvruksh as each and every part of it can be useful for mankind. Various products such as oil for cooking, nut in the tender form as nourishing drink, coir and coco pith etc. from the husk are produced from the coconut. Livelihood of the people in coastal areas of the country including Maharashtra is largely dependent on the coconut tree.

The coir industry is traditional, agro based, export oriented cottage industry that generates large scale employment. In coir producing states, thousands of cottage industries are manufacturing Coir and Coir products from the coconut husk. A large number of women from economically weaker sections are working in this industry. Coir Products are bio degradable and eco-friendly in nature.

At present in the state of Maharashtra, only 1% of the available husk is processed for producing coir and coir based products. Therefore, there is a scope for development of coir based industry in the state. In view of above, the Government intends to introduce a policy for development of coir industry and coir entrepreneurs.

**GOVERNMENT RESOLUTION:-**

In order to promote rural entrepreneurship by creating employment opportunities through the coir industry in the state, cause women empowerment through women entrepreneurship development through value addition of coir and coco pith based products , promote the use of sustainable and eco-friendly coir and coir based products within and outside the India, develop domestic and international market for coir and coir based products, promote plantation of coconut by maximum utilization of coir husk; the Government hereby gives approval to the ' State Coir Industries Development Policy- 2018 ' for development of coir industries in the state.

The salient features of the aforesaid policy are as follows :-

1. **Scope of policy** :-

The Micro, Small & Medium enterprises having Udyog Aadhar Memorandum under the Micro, Small & Medium Enterprises Development act-2006 and eligible enterprises under package scheme of incentives 2013 would be eligible for special incentives scheme under this policy.

2. **Special incentive scheme :-**

**(a) Additional benefit under package scheme of incentives**

The coir industries in A and B zone will be eligible for benefits available for the industries in C zone. The coir industries in C and D zone will be eligible for benefits available for Industries in D+ zone. The industries in D+ and districts with no industries will be eligible for the benefits available to industries in the naxal affected area

**(b) Special Capital Incentives**

Taluka-wise classification under the package scheme of incentives new as well as expansion MSMEs will be eligible for special capital subsidy at the rate 30% to 35 % on the fixed capital investment limited to maximum Rs. 50 lakhs. The capital subsidy will be disbursed in five equal annual installments from the date of commencement of production.

| Sr. No. | Classification of Talukas as per PSI-2013. | Capital Subsidy (% fixed capital investment) | Maximum ceiling for Special Capital Subsidy (in Rs. lacs) |
|---|---|---|---|
| 1. | A & B | 30 | 20 |
| 2. | C | 35 | 30 |
| 3. | D | 35 | 40 |
| 4. | D+ | 35 | 50 |
| 5. | Non-Industry and naxal affected area | 35 | 50 |

The industries are eligible for capital subsidy under other scheme of state government or Central government will be eligible for the benefits of the said scheme, however, the total admissible capital subsidy will be restricted up to 50%.

3. **Cluster Development**

Under the scheme of Maharashtra state industrial cluster development programme (MSI-CDP) five common facility centers will be established for coir based MSMEs. They will be provided assistance in the form of subsidy up to 90 % of the project cost. The funds required setting up common facility centers would made available from the budgeted provision of Industries Department.

**4. Coir industries incubation, research and development Center**

The coir industries, Incubation, research and development Centre will be set up at (MAHACOIR), Kudal developed by Maharashtra Small Scale industries Development Corporation.

Detail orders incorporating separate guidelines for special incentives scheme, and other schemes for the present coir policy will be issued separately.

**5. State Level Implementing Committee**

A State Level Committee comprising following members will be constituted for implementation, monitoring, resolving the issues and difficulties while implementing the schemes under the policy:-

| | | |
|---|---|---|
| 1. | Development Commissioner ( Industries ) | Chairman |
| 2. | Managing Director ,<br>Maharashtra Small Scale Industries Development Corporation | Member Secretary |
| 3. | Chief Executive officer,<br>Maharashtra State Khadi & Village Industries Board | Member |
| 4. | Joint Commissioner , GST Commissionerate | Member |
| **5.** | Joint Director Industries ( MSME ) | Member |

The state level committee will decide the qualification, criteria and distribution system for implementing the said policy and also take decision for improvement of the same.

**6. Implementing Agency**

Various incentives under Package Scheme of Incentive as well as Cluster development would be implemented by Directorate of industries and Marketing assistance, Skill & entrepreneurship development and Incubation and R & D center etc. schemes will be implemented by Maharashtra Small Scale Industries Development Corporation.

**7. Policy validity**

The policy will be valid for five years from the date of issue of Government Resolution or till further orders.

This Government Resolution is issued with the concurrence of Finance Department and Planning Department.

The Government Resolution is available at the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in code no. for this is 201802151224188810. The order has been signed digitally.

By the order and in the name of the Governor of Maharashtra.

Rajiv Madhav Ambikar

Digitally signed by Rajiv Madhav Ambikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4afb47d807935092599a3e28024dd3d3c461bada30a950e81e666a02aad578f5, cn=Rajiv Madhav Ambikar
Date: 2018.02.15 12:40:12 +05'30'

**(Rajiv M.Ambikar)**
Desk Officer,
Government of Maharashtra

**Copy To,**

1. Additional Chief Secretary to Hon'ble Chief Minister, Maharashtra State, Mantralaya, Mumbai-400032
2. Private Secretary to all Hon'ble Ministers and Hon'ble State Ministers, Mantralaya, Mumbai
3. Personal Secretary to Hon'ble leader of opposition, Maharashtra Legislature Council, Vidhanparishad/Vidhan sabha, Mumbai.
4. All members of Maharashtra Legislative Assembly,
5. Hon'ble Chief Secretary, Maharashtra State, Mantralaya, Mumbai
6. Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary of all Departments, Mantralaya, Mumbai.
7. Chief executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Andheri,Mumbai.
8. Development Commissioner & Industries Director, New Administrative Building, 1st floor, Mantralya, Mumbai-400032
9. Commissioner, Skill Development, Employment & Self-employment, Directorate, Konkan Bhavan, Navi Mumbai,
10. Managing Director,Maharashtra Small Scale Industries Development Corporation,Mumbai
11. Accountant General, (Accounts & Audit), Maharashtra-1/2, Mumbai/, Nagpur
12. Pay & Accounts officer, Mumbai
13. Resident Audit officer, Mumbai